* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

दिनांक :– ०७/०९/२०१९

### *गणपती उत्सवाच्या पार्श्वभुमीवर कारंजा शहरातील रेकॉर्ड वरील गुन्हेगारांचे चेकींग मोहिमेदरम्यान स्थानिक गुन्हे शाखेकडुन अवैध शस्त्र साठा जप्त.*

मा. पोलीस अधिक्षक वसंत परदेशी सो यांनी वाशिम जिल्हा पोलीस दलाचा पदभार स्विकारलेल्या पासुन वाशिम जिल्हयातील गुंड प्रवृत्तीच्या,सराईत गुन्हेगार व्यक्तीविरोधात धडक कार्यवाही, अवैध धंदयाविरुध्द कार्यवाही करून गुंड प्रवृत्तीच्या लोकांच्या मुसक्या आवळल्या आहेत. त्याच अनुषंगाने आगामी विविध सण उत्सवाचे पार्श्वभुमीवर मा. वसंत परदेशी जिल्हा पोलीस अधिक्षक सो यांचे मार्गदर्शनात दिनांक ०७/०९/१९ रोजी पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी यांचे आदेशान्वये कारंजा शहरातील रेकॉर्ड वरील गुन्हेगार चेकींग मोहिम राबवित असताना वाशिम शहरातील  १) अमोल विजय गावंडे रा. शिवाजी नगर कारंजा २) अब्दुल सलीम अब्दुल मजीद ऊर्फ सलीम भंगारवाले रा. मंगळवार नगर कारंजा यांचे घराची घरझडती घेतली असता शस्त्रासंबंधाने काही आक्षेपार्ह मिळुन न आल्याने तसा निल घरझडती पंचनामा करण्यात आला. तसेच रेकॉर्ड वरील मोहमद बिलाल अब्दुल सलाम वय ३० वर्षे रा. हबीब नगर कारंजा याचे रहाते घराची घर झडती घेतली असता त्यांचे घरझडती मध्ये **०२ तलवार, १ कोयता, २ मोठे सुरे, १ रामपुरी चाकु, १ खंजीर, १ गुप्ती, २ चाकु, १ फरशी कुऱ्हाड व ५ लोखंडी पाईप असे एकुण १६ घातक शस्त्रे** किंमत अंदाजे ६६५०/– रू. चे मिळुन आल्याने ते शस्त्र मोहमद बिलाल अब्दुल सलाम वय ३० वर्षे रा. हबीब नगर कारंजा याचे राहते घरातुन जप्त करुन ते सर्व साहीत्यासह मोहमद बिलाल अब्दुल सलाम वय ३० वर्षे रा. हबीब नगर कारंजा याचेसह ताब्यात घेतले.

अशा प्रकारे मोहमद बिलाल अब्दुल सलाम वय ३० वर्षे रा. हबीब नगर कारंजा याने आपले रहाते घरात बेकायदेशीररित्या घातक शस्त्रे बाळगुन ठेवलेला साठा मिळुन आला. त्याचे हे कृत्य कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा १९५९ व सह कलम १३५ मपोका अन्वये गुन्हा होत असल्याने त्याचे विरुध्द पोलीस उपनिरीक्षक भगवान पायघन यांनी कायदेशीर फिर्याद देऊन कारवाई केली.

मा. पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी, अपर पोलीस अधिक्षक श्री विजय कुमार चव्हाण यांचे मार्गदर्शनात पोलीस निरिक्षक शिवा ठाकरे, सपोनि अतुल मोहनकर, पोउपनिरी भगवान पायघन, सपोउपनि भगवान गावंडे, पोहवा संजय नंदकुले नापोकॉ किशोर चिंचोळकर, सुनिल पवार, राजेश राठोड, प्रशांत राजगुरु, मुकेश भगत, प्रेमदास आडे, बाळु कंकाळ, प्रेम राठोड, पोकॉ बालाजी बर्वे, संतोष शेणकुडे, अमोल इंगोले, अश्विन जाधव, निलेश इंगळे,प्रविण राऊत, मपोना तेहमिना शेख, मपोकॉ रेश्मा ठाकरे, चालक पो.ना. मिलींद गायकवाड, चालक पोकॉ श्याम इंगळे असे सरकारी जीप क्र. एमएच ३७ ए ४२३५ व एमएच ३७ ए ४२४५ या पथकाने केली.

मा. पोलीस अधिक्षक वाशिम श्री वसंत परदेशी यांनी सर्व जनतेस सुजाण नागरिक म्हणुन, नमुद आरोपी विरुध्द काही तक्रार असल्यास अथवा या व्यतिरिक्त अवैध रित्या शस्त्र बाळगणाऱ्या अधिक गुन्हेगारांची माहिती आपणाकडे असल्यास आपण परस्पर मा. पोलीस अधिक श्री. वसंत परदेशी अथवा स्थागुशा पोलिस निरिक्षक शिवा ठाकरे यांचेशी संपर्क साधावा. माहिती देणाऱ्या इसमाचे नाव गोपनिय ठेवण्यात येईल असे आवाहन केले आहे.

Sthalcare ७/९/१९

पोलीस निरिक्षक

स्थानिक गुन्हे शाखा वाशिम

